ISSN 2231-1629
Knowledge Resonance
● Vol-9 No. 2 ● July-December 2020

# भारतीय सार्वजनिक उपक्रमांची उत्पादकता

डॉ. बाळासाहेब निर्मळ
देवगिरी महाविद्यालय; औरंगाबाद

1991 हे वर्ष भारताच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रात व्यापक बदल घडवून आणणारे आहे. कारण 90 च्या दशकात जागतिक स्तरावर होत असलेल्या घडामोडी विशेषतः राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात होत असलेले बदल आणि त्यामधून समोर आलेली विचारसरणी (जागतिकी करण, उदारीकरण आणि खाजगी करण) या अनूरुप सर्व विकसीत आणि विकसनशिल देशामध्ये विविध सूधारणा कार्यक्रम हाती घेवून देशाची आर्थिक संरचना आणि प्रशासन व्यवस्थेमध्ये बदल करण्यात येवू लागले. या नवीन विचारसरणीला अधिक लोकप्रिय आणि व्यवहारिक तसेच प्रासंगिक बनविण्यात 'मार्गारेट थॅचर' आणि 'रोनाल्ड रेगन' या प्रमूख नेत्यांनी अत्यंत महत्वाची भूमिका बजावली आहे.

आज ही बाब सिध्द झाली आहे की राजकीय व्यवस्था म्हणून लोकशाही आणि आर्थिक व्यवस्थामध्ये भांडवलशाहीला अन्य पर्यायी आणि सक्षम व्यवस्था आज जगासमोर उपलब्ध नाही. या विचारसरणीनुरुप करण्यात येणाऱ्या बदलामध्ये राज्यांचा अर्थव्यवस्थेमधील हस्तेक्षप कमी करणे, मर्यादित शासन, विनोकर शाही करण, पार दर्शकता, जनतेचा सहभाग, लोक निवड दृष्टीकोन, खाजगीकरण, सेवेची उत्तम गुणवत्ता आणि त्यांची हमी देणारी व्यवस्था, देशादेशामधील व्यापारवरील निर्बध आणि अनावश्यक कायदे रद्द किंवा त्यात बदल करणे, उदारिकरणाच्या माध्यमातून देशातील कायदे आणि प्रक्रियांची कठोरता कमी करुन प्रशासकीय कामकाज पध्दती अधिक सुलभ करण्यावर भर दिला जात आहे. ही विचारसरणी जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आणि जागतिक पातवळीर विकास कार्याला गती देण्यासाठी अर्थसाहय्य करणार्ध्या विविध संस्था आणि संघटनांनी घेतल्यामूळे अविकसीत आणि विकसनशिल देशातील सरकारने सूधारणा कार्यक्रम हाती घेतला आहे. सार्वजनिक उद्योगाबाबतच्या धोरणात बदल केला जात आहे.सार्वजनिक उपक्रमात सूधारणा करताना प्रामूख्याने पूढील सुधारणांना अधिक प्राधान्य दिले जात आहे. त्यामध्ये एकाधिकार क्षेत्रातील सार्वजनिक क्षेत्राची संख्या कमी करणे तोट्यात चालणारे उपक्रम बंद करणे, सार्वजनिक उपक्रमांत सरकारी गुंतवणूकीतील वाटा कमी करणे, व्यवस्थापकीय तत्त्वाचा स्वीकार करणे, निर्गुंतवणूक धोरणांची अंमलबजावणी करणे, लाइसन कोटा परमिट राजची समाप्ती करणे, डब्ल प्रणालीचा स्वीकार करुन या उद्योगांना अधिक स्वायत्तता देणे, सार्वजनिक उपक्रमां मध्ये अधिक पार दर्शकता आणि अनियीमतता दुर करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर, कुशल मानव संसाधनावर भर देवून अतिरीक्त कर्मचार्‌साठी कपातीचे धोरण, कारपोरेट सामाजिक उत्तर दायित्व आणि सरकारी उपक्रमांचे सुदृढी करण, आधुनिकी करण, पुनर्संरचना आणि पुनर्गठन इत्यादी विविध धोरणांची अंमलबजावणी सार्वजनिक क्षेत्रात केली जात आहे. उद 5 या सर्व सुधारणाचा फायदा काय झाला. या सार्वजनिक उपक्रमांच्या निर्मिती मागील सरकारची पुर्वीची भूमिका आणि 1991 नंतर सरकारच्या बदलत्या भुमिकेमूळे सार्वजनिक उपक्रमात जे बदल केले त्यांची फलनिष्पत्ती काय झाली . यामुळे सार्वजनिक उपक्रमाच्या उत्पादकतेमध्ये काय बदल झाले याचा शोध घेण्यांचा प्रयत्न या संशोधन पेपर मध्ये करण्यात आला आहे

## सार्वजनिक उपक्रमांची उत्पादकता


सार्वजनिक उपक्रमांची उत्पादकता हा घटक सार्वजनिक उपक्रमांच्या अस्तित्वावर प्रश्न निर्माण करणारा आहे. विशेषतः उत्पादन, खनन आणि विद्युत क्षेत्रातील उपक्रमामध्ये मोठ्या प्रमाणात भांडवलाची गुंतवणुक केली जाते. त्यामूळे या उपक्रमांची उत्पादकता हा नेहमी चर्चेचा विषय असतो. उत्पादन क्षेत्रातील सार्वजनिक उपक्रमांचे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे या उपक्रमातील आवक च्या तुलनेत उपक्रमांची जास्तीची उत्पादकता होय. मुळात कोणत्याही सार्वजनिक उपक्रमांची उत्पादकता ही अंर्तगत आणि बाह्य घटकांनी प्रभावित होत असते. अंर्तगत घटकात वापरातील तंत्रज्ञान, श्रमाची गूणवत्ता, आउटपुटचा स्तर तर बाह्यघटकांत देशातील अंर्तगत व्याज दर, पायाभूत सुविधा, हवामान, कायदा आणि सुव्यवस्था आणि देशाच्या अर्थव्यवस्थेची समग्र स्थिती इत्यादी घटकाचा प्रभाव त्या देशातील सार्वजनिक उपक्रमांच्या उत्पादकतेवर होत असतो.

बदलत्या परिस्थितीनुरुप सार्वजनिक उपक्रमांची उत्पादकता निर्धारित करणाऱ्या घटकांमध्ये बदल होत आहेत. त्यामध्ये प्रामूख्याने क्षमतेचा उपयोग, विक्रीच्या दृष्टीकोनातून मालसूची, उर्जा उपयोग इत्यादी घटकावर सार्वजनिक उपक्रमांची उत्पादकता निश्चित केली जाते. जे उपक्रम बहुउत्पादक असतात त्या उपक्रमांची उत्पादकता देखील निश्चित करताना निश्चित क्षमतेचा उपयोग हाच निकष लावला जातो. भारतीय सार्वजनिक उपक्रमांची उत्पादकता क्षमतेचा उपयोग या वर निश्चित केली जाते. त्याचे विवरण पुढील आकृतीत दिले आहे.

ISSN 2231-1629
Knowledge Resonance
● Vol-9 No. 2 ● July-December 2020

आकृती क्रं.1.1.

**सार्वजनिक उपक्रमांची उत्पादकता**




***Source-Public Enterprises Survey-2013-14***

आकृती कृं. 4.17 % चे विश्लेषण केले असता असे दिसून येते की 2007–08 मध्ये उत्पादन क्षेत्रात एकूण 77% उपक्रम कार्यरत होते त्यांचा एकूण क्षमतेच्या वापराचा विचार करता असे दिसून येते की, 75% पेक्षा अधिक क्षमतेचा वापर 48 उपक्रमांनी केला तर 75% पर्यंत क्षमतेचा वापर 16% उपक्रमांनी केला, आणि 50ः% पेक्षा अधिक क्षमतेचा वापर करणारे एकूण 13% उपक्रम उत्पादन क्षेत्रात कार्यरत होते. हीच संख्या 2013–14 मध्ये उत्पादन क्षेत्रात एकूण 65% उपक्रम कार्यरत होते. त्यांचा एकूण क्षमतेचा वापराचा विचार करता असे दिसून येते की, 75% पेक्षा अधिक क्षमतेचा वापर 40% उपक्रमांनी केला तर 75% पर्यंत क्षमतेचा वापर 14% उपक्रमांनी केला, आणि 50% पेक्षा अधिक क्षमतेचा वापर करणारे एकूण 11% उपक्रम उत्पादन क्षेत्रात कार्यरत होते. निश्चित 2007–08 च्या तुलनेत ही संख्या कमी असली तरी यावर तत्कालीन जागतिक आर्थिक मंदीचे सावट असल्याने बहुतांश उपक्रमांनी आपले उत्पादन थांबविले आहे.

2013–14 मध्ये विविध क्षेत्रातील उत्पादन करणार्या उपक्रमांच्या उत्पादकतेचा विचार करता असे दिसून येते की, खनिज आणि धातु क्षेत्रात एकूण 04% उपक्रम कार्यरत आहेत. यामधील नॅशनल एल्युमिनियम कॉर्पोरेशन लिमीटेड हा बहुउत्पादक उपक्रम असून या उपक्रमांचा उत्पादक घटकानिहाय उत्पादक क्षमता आणि प्रत्यक्षात केलेल्या उत्पादनाचे प्रमाण एल्युमिनियम 68.80% एल्युमिना 91.67% बॉक्साइट 99.88% आणि विद्युत 62.06% क्षमतेचा वापर करुन खनिज आणि धातु क्षेत्रात हा उपक्रम प्रथम स्थानी आहे. परंतु खनिज आणि धातु क्षेत्राची एकूण उत्पादन क्षमतापैकी 65% क्षमतेचाच वापर केला जात आहे. लोखंड आणि पोलाद क्षेत्रात एकूण 06% उपक्रम कार्यरत आहेत. त्यापैकी मिश्रधातु निगम लिमीटेड ने 120% तर बहुउत्पादक राष्ट्रीय इस्पात निगम लि. ने 115% क्षमतेचा वापर केला आहे. या क्षेत्राची एकूण उत्पादकता 85% आहे. रासायनिक खते या क्षेत्रात एकूण 05% उपक्रम कार्यरत आहेत. या क्षेत्रातील उपक्रमांच्या उत्पादकतेचे विश्लेषण केले असता असे दिसून येते की, ब्रह्मपुत्रा वेली फर्टीलाइजर कार्पोरेशन लि.युरिया 60% मद्रास फर्टीलाइजर लि.100%, नेशनल फर्टीलाइजर लि. 101.92% राष्ट्रीय केमिकल्स फर्टीलाइजर लि. 117% क्षमतेचा वापर केला आहे. म्हणजेच रसायनिक खते या क्षेत्रातील सार्वजनिक उपक्रमांची उत्पादकता 100% आहे.

पेट्रोलियम क्षेत्राचा विचार करता यामध्ये एकूण 06 उपक्रम कार्यरत असून यातील पाच उपक्रम हे बहुउत्पादक म्हणून कार्यरत आहेत. यामध्ये सर्वाधिक उत्पादक क्षमता चेन्नई पेट्रोलियम कॉरपोरेशन लि. 92.40% तर भारत पेट्रोलियम कॉरपोरेशन लि. मध्ये इंधन रिफानरी 108.6ः एरोमेंटिक बेनजेन 19.21% एरोमैटिक्स 23.12ः%लुब्रिकेन्ड्स 103.90% सल्फर 78.57% उत्पादकता आहे. या क्षेत्रातील सर्व उपक्रमांची उत्पादकता 85% आहे. उर्जा उत्पादन क्षेत्रात एकूण 07% सार्वजनिक उपक्रम कार्यरत आहेत. या क्षेत्रातील उपक्रमांची उत्पादकता अनुक्रमे एनटीपीसी 81.5% एनएचडीसी 92.69ः एन.जेवीएन 105% इतका क्षमतेचा वापर केला आहे. उर्जा उत्पादन क्षेत्रातील सार्वजनिक उपक्रमांची उत्पादकता 90% आहे.

उपभोक्ता वस्तु या क्षेत्रात एकूण 07 उपक्रम कार्यरत असून यातील 4 उपक्रम हे बहुउत्पादक म्हणून कार्यरत आहेत. यामध ील हिंदुस्थान न्युज पेपर प्रिंट लि. या उपक्रमांची उत्पादन क्षमता 103.36 आहे. तर एचएलएल लाईफ केअर लिमिटेड हा बहुउत्पादक उपक्रम असून या उपक्रमांचा उत्पादक घटक निहाय उत्पादक क्षमता आणि प्रत्यक्षात केलेल्या उत्पादनाचे प्रमाण कंडोम 101.89% रक्तथैली 92.08% कॉपरटी 93.09%, स्टेरोयड ओसीजीएस 32.09% प्रेगनेसी टेस्टकार्ड 68.27% आणि सुटीरेस 63.11% क्षमतेचा वापर केला तर या क्षेत्रातील सर्वात कमी उत्पादकता सिमेंट कॉरपोरेशन ऑफ इंडिया 2145%आहे. वाहतूक या क्षेत्रात एकूण 06 उपक्रम कार्यरत असून या क्षेत्रातील सर्वाधिक उत्पादकता बीईएमएल लि. 103%, कोचीन शिपयार्ड 103% तर सर्वात कमी उत्पादकता गार्डनरीच शिपबिल्डर्स एन्ड इंजिनियर्स लिमिटेडची 80ः उत्पादकता आहे.

अवजड उद्योग क्षेत्रात एकूण 04 उपक्रम कार्यरत आहेत त्यापैकी 03 उपक्रम बहुउत्पादक आहेत. याक्षेत्रातील कार्यरत

उपक्रमामध्ये सर्वाधिक उत्पादकता भेल इलेक्ट्रीकल्स मशीन्स लिमिटेड 115% बहुउत्पादक मध्ये भारत हैवी इलेक्ट्रीकल्स लि. या उपक्रमांची उत्पादन निहाय उत्पादकतामध्ये टर्बाइन 45% जनरेटर 72% बायलर 90% पावर ट्रासफार्मर 75% इलेक्ट्रीकल्स मशीन्स 43% उत्पादकता आहे.

यावरुन असे दिसून येते की उर्जा, वाहतूक, पेट्रोलियम, रासायनिक खते, या क्षेत्रात उत्पादन करणार्या उपक्रमामध्ये आपल्या पुर्ण क्षमतेचा वापर केला असला तरी रसायन, अवजड उद्योग, मध्यम इंजिनियरिंग, कच्चे तेल आणि ग्राहक सेवा या क्षेत्रात उत्पादन करणार्या उपक्रमामध्ये आपल्या पुर्ण क्षमतेचा वापर केला जात नाही ही चिंतेची बाब आहे. या बरोबरच या सर्वच क्षेत्रातील बहुउत्पादक उपक्रमांची उत्पादकता ही 65% पेक्षा जास्त नाही. परंतु 1991च्या सुधारणा कार्यक्रमांचा दृष्य परिणाम म्हणजे सार्वजनिक उपक्रम विशेषतः उत्पादन आणि विनिर्माण क्षेत्रात कार्यरत असणार्या उपक्रमांच्या एकूण क्षमता आणि उत्पादकतामध्ये वाढ झाली आहे. विशेषतः आज देखील सार्वजनिक उपक्रमांच्या प्रमुख समस्यामध्ये आवश्यक विद्युत पुरवठा, उच्च तंत्रज्ञान व कच्चा माल क्रूड, आणि 2005 पासुन जागतिक स्तरावरील आर्थिक मंदीच्या सावटाने मागणी मध्ये झालेली घट यामुळे अनेक उपक्रमांनी आपले उत्पादनात कपात केली असली तरी भारतीय सार्वजनिक उपक्रमांच्या उत्पादन क्षमतेमध्ये वाढ होताना दिसते.

***संदर्भ ग्रंथ :–***

1) *खेर सी. पं. – आर्थिक सुधारणांचे नवे पर्व, दिलीप राज प्रकाशन प्रा. लि.पुणे, 1999.*

2) *Dube Ashok Kumar 2008) kisvi Shatabadi Main Lok Prashashan, Tata Mcgraw-Hill.*

3) *कित्ता, Pag.No 132*

4) *केळकर चंद्रकात (2001),नाणेनिधी व जागतिक बँक यांचा नव–वसाहतवाद, लोकवाङःमय गृह मुंबई,*

5) *Public Enterprises Survey – 2013 -14.*

6) *कित्ता, 2013 –14.*

7) *बिवलकर रा.म. (1976),भारतीय नियोजन, गो.य. राणे प्रकाशन पुणे,*

8) *Public Enterprises Survey 2013 -14.*

9) *पाटील ज. फा., ताम्हणकर पी. जे.(1980),विकास व नियोजनाचे अर्थशास्त्र,कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर पुणे,*

10) *कटारिया सुरेन्द्र (2007),आर्थिक नीती एवं प्रशासन, मलिक एण्ड कम्पनी जयपूर,.*